# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक २६ / २०२२

नवीन वीज जोडणी वेळेत न झाल्याने नुकसान भरपाई मिळण्याबाबत

श्री. गोपाळ नारायण पडवळ ............................................................................. अपिलार्थी

विरुध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, चिपळूण (महावितरण) ................................................ प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- आनंद शिवराम ओक, ग्राहक प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :- कैलाश पी. लवेकर, कार्यकारी अभियंता, चिपळूण

कोरम :- वन्दना कृष्णा (निवृत्त भा.प्र.से.)

सुनावणी तारीख :- १३ एप्रिल २०२२

आदेश पारित दिनांक :- २२ एप्रिल २०२२

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, कोल्हापूर परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक ३१ ऑगष्ट २०२१ चा आदेश व त्यावरील दिनांक २३ नोव्हेंबर २०२१ च्या पुनर्विलोकन आदेशाविरुध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक १० फेब्रुवारी २०२२ रोजी दाखल केलेले आहे.

२. मंचाने तक्रारदार यांचा अर्ज क्रमांक ०४/२०२० बाबत दिनांक ३१ ऑगष्ट २०२१ रोजी खालील प्रमाणे आदेश पारित केला.

> *"१) तक्रारदार यांचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.*
>
> *२) तक्रारदार यांची विद्युत वितरण कंपनीकडुन त्यांना घरगुती विद्युत जोडणी देणेस झालेल्या विलंबाबाबत नुकसान भरपाईची मागणी नामंजूर करण्यात येत आहे."*

मंचाच्या आदेशाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दिनांक ८ ऑक्टोबर २०२१ रोजी पुन्हा पुनर्विलोकन अर्ज दाखल केला. सदर पुनर्विलोकन अर्ज दिनांक २३ नोव्हेंबर २०२१ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर केला.

३. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनात सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थीने घरगुती नवीन वीज जोडणीसाठीचा विहित नमुन्यातील अर्ज योग्य कागदपत्रासह दिनांक २४ जून २०१३ रोजी प्रतिवादी महावितरण (चिपळूण उपविभाग) यांच्या कार्यालयात सादर केला.
- तथापि, प्रतिवादी दिनांक ११ सप्टेंबर २०१४ रोजी महावितरण (चिपळूण उपविभाग) यांच्याकडुन रु.५६५/- चे कोटेशन देण्यात आले. तथापि, कोटेशनवर दिनांक २४ फेब्रुवारी २०१४ अशी खोडसाळपणे नमुद केली. सदर कोटेशनचा भरणा दिनांक ७ नोव्हेंबर २०१४ रोजी केला.
- अखेर दिनांक ४ फेब्रुवारी २०२१ रोजी एकुण ७ वर्षाच्या विलंबाने अपिलार्थीस वीज जोडणी देण्यात आली. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ (कृती मानके, विनियम २००५) मधील विनियम १२.२(३) नुसार नुकसान भरपाई दिली नाही म्हणून दिनांक २२ जानेवारी २०२१ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे (कक्ष) तक्रार दाखल केली. कक्षाने दिनांक २४ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या आदेशान्वये सदर तक्रार फेटाळली.
- कक्षाच्या आदेशाने समाधान झाले नाही म्हणून दिनांक ३० मार्च २०२१ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक ३१ ऑगष्ट २०२१ रोजीच्या आदेशाने अपिलार्थीची नुकसान भरपाईची मागणी नामंजूर केली. अपिलार्थीचे मंचाच्या आदेशाने समाधान झाले

नाही म्हणून दिनांक ८ ऑक्टोबर २०२१ रोजी पुन्हा पुनर्विलोकन अर्ज दाखल केला. सदर पुनर्विलोकन अर्ज दिनांक २३ नोव्हेंबर २०२१ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर केला.

- मंचाच्या आदेशाने समाधान झाले नाही म्हणून दिनांक १० फेब्रुवारी २०२२ रोजी विद्युत लोकपाल (मुंबई) याच्यांकडे अभिवेदन दाखल केले.
- अपिलार्थीने अभिवेदनात खालील प्रमाणे मागण्या केल्या आहेत.
    - मंचाचे दोन्ही निकालपत्रे रद्द करण्यात यावीत.
    - कृती मानके, विनियम २००५ मधील ४.७ नुसार जागा तपासणीच्या अपयशाबाबत रु.६२००/- ची नुकसान भरपाई मिळावी.
    - कृती मानके, विनियम २००५ मधील ४.७ नुसार कोटेशन दिले जाण्याच्या अपयशाबाबत रु.५९००/- ची नुकसान भरपाई मिळावी.
    - कृती मानके, विनियम २००५ मधील ४.५ नुसार वीज जोडणीस झालेल्या उशीरास रु.३८०००/- नुकसान भरपाई मिळावी.
    - कक्षाकडे, मंचाकडे अभिवेदन दाखल करण्यास झालेला खर्च देण्यात यावा.
    - वीज जोडणी देण्यास झालेल्या उशीरास कारणीभुत असलेल्या प्रतिवादीच्या जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी व नुकसान भरपाईची रक्कम त्यांच्याकडुन वसूल करण्यात यावी अशी मागणी अभिवेदनात केली.

४. प्रतिवादी महावितरणने दिनांक ३० मार्च २०२२ च्या उत्तरात खालील प्रमाणे मुद्दे नमुद केले.

- अपिलार्थी यांनी दिनांक २४ फेब्रुवारी २०१४ रोजी चिपळूण ग्रामीण उपविभागांतर्गत पाचाड शाखा कार्यालय येथे नवीन घरगुती वीज जोडणीसाठीचा अर्ज केला होता. सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदर जागेची पाहणी करुन आवश्यक असलेल्या तीन पोलचे अंदाजपत्रक बनविण्यात आले व ते मंजूर झाल्यानंतर अपिलार्थीस दिनांक ११ ऑगष्ट २०१४ रोजी कोटेशन देण्यात आले. सदर कोटेशनच्या रक्कमेचा अपिलार्थीने ७ नोव्हेंबर २०१४ रोजी भरणा केला.
- त्यानंतर सदर ठिकाणी पोल उभारणी करण्यासाठी ठेकेदार गेले असता, संबधीत जागा मालक श्री. संभाजी सखाराम पडवळ यांनी हरकत घेतली. तसे अपिलार्थीना दिनांक १ ऑगष्ट २०१७ रोजी कळविण्यात आले. त्यामुळे वीज जोडणीचे कामास विलंब झाला. त्यानंतर सुधारीत पाच पोलचे अंदाजपत्रक तयार करुन ते मंजूर झाल्यानंतर सदर ठिकाणी

ठेकेदार पुन्हा गेले असता संबधीत जागा मालक श्री. निवाते, श्री. जडे व श्री. गावनंग यांनी पुन्हा हरकत घेतली. त्यामुळे दिनांक १४ जानेवारी २०२१ रोजी अपिलार्थी, गावचे पोलीस पाटील, श्री. निवाते, श्री. जडे व श्री. गावनंग, तंटा मुक्ती अध्यक्ष श्री. हरकतदार व पाचाड शाखा अभियंता यांची सयुंक्त बैठक घेण्यात आली व त्या विषयाचा पंचनामा करण्यात आला व तक्रारदारांनी त्याबाबत आपली सहमती दिली. त्यानंतर पोल उभारणीच्या कामास सुरवात झाली. सदरचे काम दिनांक २० जानेवारी २०२१ रोजी पूर्ण होऊन अपिलार्थीस दिनांक ४ फेब्रुवारी २०२१ रोजी वीज जोडणी देण्यात आली.

- दरम्यानच्या काळात अपिलार्थीने कक्षाकडे दिनांक २२ जानेवारी २०२१ रोजी तक्रार दाखल केली कक्षाने दिनांक २४ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या आदेशान्वये सदर तक्रार फेटाळली.
- कक्षाच्या आदेशाने समाधान झाले नाही. म्हणून दिनांक ३० मार्च २०२१ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक ३१ ऑगष्ट २०२१ रोजीच्या आदेशाने अपिलार्थींची नुकसानभरपाईची मागणी नामंजूर केली. अपिलार्थीने मंचाच्या आदेशाने समाधान झाले नाही, म्हणून दिनांक ८ ऑक्टोबर २०२१ रोजी पुनर्विलोकन अर्ज दाखल केला. सदर पुनर्विलोकन अर्ज दिनांक २३ नोव्हेंबर २०२१ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर केला.
- अपिलार्थी यांना वीज जोडणी देण्याबाबत प्रतिवादी महावितरणने प्रामाणिकपणे प्रयत्न केलेले आहेत व जाणीवपूर्वक उशीर केलेला नाही, त्यामुळे वीज जोडणीस झालेल्या विलंबास प्रतिवादी महावितरण जबाबदार नाही. सबब, अपिलार्थी यांचे अभिवेदन फेटाळण्यात यावे ही विनंती.

५. सदर अभिवेदनाची सुनावणी दिनांक १३ एप्रिल २०२२ रोजी घेण्यात आली. दोन्ही पक्षांनी आपल्या लेखी निवेदनातील मुद्दे पुनश्चः मांडले. अपिलार्थीने नमुद केले की, त्यांचा अर्ज दिनांक २४ जून २०१३ रोजीचाच होता, परंतू प्रतिवादीने तो खोडसाळपणे दिनांक २४ फेब्रुवारी २०१४ चा दाखविला. त्यासोबत दिनांक ५ ऑक्टोबर २०१३ रोजी सादर केलेले स्टँपपेपरवरील प्रतिज्ञापत्र हे प्रतिवादीने मागितल्या नंतर दिले. सबब, असे बेकायदेशीर प्रतिज्ञापत्र ग्राहकाकडुन त्याच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन तयार करून घेणे व तो अधिकृत असल्याचे भासविणे व त्याआधारे वीज जोडणीस झालेल्या विलंबाचे व अन्य लोकांकडून घेतल्या गेलेल्या हरकतीचे खापर ग्राहकावर फोडणे हे बेकायदेशीर आहे. अश्या अपप्रवृत्तीच्या अधिकाऱ्यांवर खातेनिहाय कारवाई करण्यात यावी. प्रतिवादींनी माननीय तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे सदर वीज जोडणीस आलेल्या हरकतीबाबत तक्रार करणे आवश्यक होते, परंतू प्रतिवादींनी त्याबाबत कोणतीही पावले उचलली नाहीत.

श्री. संभाजी सखाराम पडवळ यांचा तारीख नसलेल्या अर्ज हा संशयास्पद असल्याने तो विचारात घेतला जाऊ नये अशी विनंती अपिलार्थींनी सूनावणी दरम्यान केली. वीज जोडणीस झालेल्या विलंबाबाबत कृती मानके, विनियम २००५ मधील विनियम १२.२(३) व विनियम ४.७ नुसार नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी सुनावणी दरम्यान अपिलार्थीने केली.

६. प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थींचा अर्ज हा दिनांक २४ जून २०१३ चा नसुन परिपूर्ण अर्ज दिनांक २४ फेब्रुवारी २०१४ सादर केला होता, तशी कार्यालयात नोंद आहे. परिपूर्ण अर्जासाठी लागणारे प्रतिज्ञापत्र अपिलार्थीने दिनांक ५ ऑगष्ट २०१३ रोजी केले याची नोंद घेण्यात यावी.

अर्ज मिळाल्यानंतर तीन पोलचे अंदाजपत्रक बनविण्यात आले व ते मंजूर झाल्यानंतर पोल उभारणीच्या कामासाठी ठेकेदार गेले असता अर्जदाराचे चुलत भाऊ श्री. संभाजी सखाराम पडवळ यांच्या शेतातून पोल जाणार असल्याने त्यांनी हरकत घेतली. त्यानंतर सुधारीत ५ पोलचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. परंतू त्यानंतरही पुन्हा संबधीत अन्य ग्राहकांनी हरकत घेतली. या दोन्ही विलंबामुळे सुमारे ७ वर्षाचा विलंब झाला. शेवटी तंटामुक्ती कार्यक्रम अंतर्गत संबधीत ग्राहकांशी सयुंक्त चर्चा करून त्यांच्या सहमतीने अडचण दूर करून वीज जोडणीचे काम करण्यात आले. वेळोवेळी याची सर्व माहीती अपिलार्थीस देण्यात आली होती. त्यामुळे प्रतिवादीच्या कामावर संशय व्यक्त करणे अभिप्रेत नाही.

सर्व बाबींचा तपशिलवार विचार करता अपिलार्थीना वीज जोडणी मिळण्यासाठी प्रतिवादींनी वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे. श्री. संभाजी सखाराम पडवळ, हरकत घेणाऱ्या अन्य ग्राहकांशी, तंटामुक्त अध्यक्ष, गावचे पोलीस पाटील यांची संयुक्त बैठक घेऊन वीज जोडणी मिळण्यासाठी प्रतिवादींनी पुढाकार घेतला आहे. उलट अपिलार्थीचे स्वतःचे चुलत भाऊ यांनी हरकत घेतल्यामुळे त्यांनी स्वतः त्यांची कौंटुबिक तक्रार मिटविण्यासाठी त्यांनी स्वतः प्रयत्न केले असते तर सदर प्रकरण लवकर निकाली लागले असते.

अपिलार्थीच्या नवीन वीज जोडणीच्या अर्जानुसार त्यांना वीज जोडणी दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या वीज जोडणी बाबत प्रतिवादी महावितरणकडुन कोणताही जाणीवपूर्वक उशीर झालेला नाही. वीज जोडणीसाठी लागलेल्या पोल उभारणीसाठी संबधीत जागामालकानी घेतलेल्या हरकती दूर करताना लागलेला जास्तीचा कालावधीमुळे अपिलार्थींना वीज जोडणी देण्यास विलंब झाला असल्याचे प्रतिवादी यांनी सुनावणी दरम्यान नमुद केले. मंचाने याबाबत योग्य ते निरीक्षण नोंदवून ग्राहकाची तक्रार निकाली काढली. या सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थीची मागणी फेटाळण्यात यावी.

म.वि.नि.आ.

**विश्लेषण व निर्णय**

७. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थी यांच्या वीज जोडणी बाबत प्रतिवादी महावितरणकडुन सर्वसाधारणपणे अपेक्षित असलेली कार्यवाही केली, असे दिसून येते, अपिलार्थीचा परीपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याची शहानिशा करुन तीन पोलचे अंदाजपत्रक देण्यात आले. त्यास मंजूरी मिळाल्यानंतर कोटेशन देण्यात आले. अपिलार्थीने कोटेशनचा भरणा केल्यानंतर अपिलार्थी यांचे जागी वीज जोडणीसाठी गेले असता, आधी अपिलार्थीचे चुलत भाऊ श्री. संभाजी सखाराम पडवळ व नंतर अन्य संबधीत जागा मालकांनी हरतकी घेतली. त्यानंतर सुधारीत पाच पोलचे अंदाजपत्रक बनविण्यात आले. शेवटी प्रतिवादींनी हरकत घेणाऱ्या ग्राहकांची, तंटा मुक्ती अध्यक्ष, पोलीस पाटील व प्रतिवादींची सयुक्त सभा घेऊन अडचण दुर केली. त्यानंतर अपिलार्थीस दिनांक ४ जानेवारी २०२१ रोजी वीज जोडणी देण्यात आली. अपिलार्थीने त्यांची कौटुंबिक तक्रार मिटविण्यासाठी त्यांनी स्वतः प्रयत्न केले असते तर सदर प्रकरण लवकर निकाली लागले असते. मंचाने या सर्व बाबींचा सखोल विचार केला असल्यामुळे मंचाच्या आदेशात कोणताही बदल करण्याची गरज वाटत नाही. सबब, अपिलार्थीचे अभिवेदन नामंजूर करण्यात येत आहे.

८. सदरचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)